ePaper


# महायुतीची उद्या बैठक; पवार, पाटील, सामंतांची उपस्थिती!



| वर्ष - 7 । अंक - 318 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 7 एप्रिल 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- बटलरचं शतक भारी
- कुठे आहे मालिनी शर्मा?‘
- एनआयए’च्या पथकावर जमावाचा हल्ला
- बबनराव घोलप शिवसेना शिंदे गटात

## महापालिका आयुक्तांचा प्रशासकीय कारभार

# क्रीडा मैदानांवर खासगी संस्थांचा ‘डोळा’!

### कबड्डी प्रशिक्षण केंद्र 10 वर्षांसाठी खासगी संस्थेच्या ताब्यात

**। पिंपरी।महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासन क्रीडा विभागांतर्गत येणाऱ्या मैदानाबाबत खासगी संस्थांना मेहेरबानी दाखवित आहे. भोसरी येथील कबड्डी प्रशिक्षण केंद्र १० वर्षांकरिता खासगी संस्थेला चालविण्यास दिले आहे. महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी नुकतेच त्याला मंजुरी दिली आहे. शहरातील ४० टक्के मुले महापालिका शाळेतील घेण्याची अट घातली असली, तरी त्या बाबत सकारात्मक विचार होणार का, असा प्रश्न शहरातील खेळाडू उपस्थित करत आहेत.**



नेहरुनगर येथील मेजर ध्यानचंद हॉकी स्टेडियम महाराष्ट्र हॉकीच्या संघाला चालविण्यासाठी दिले आहे. या ठिकाणी देखील महापालिका शाळेतील मुले घेण्याची अट घातली आहे. संबंधीत संस्थेने शहरातील खेळाडूंच्या सरावासाठी पूर्ण बंदी घातल्याच्या तक्रारी महापालिकेकडे केल्या होत्या. त्याबाबत अद्याप सकारात्मक निर्णय झाला नसल्याचे खेळाडू सांगत आहेत. तसाच घाट कबड्डी प्रशिक्षण केंद्राबाबत घातला असल्याचे चित्र आहे. महापालिकेने भोसरी येथील कबड्डी प्रशिक्षण केंद्र खासगी संस्थेला चालविण्यास देण्याचा निर्णय घेतला आहे. नुकतेच त्याला मंजूरी देण्यात आली आहे. कबड्डी प्रशिक्षण केंद्र १० वर्षे कराराने चालविण्यास देण्यासाठी मागणी केली होती. नरसिंग पंचम यादव, नरसिंग रेसलिंग अकॅडमी, कांदिवली, (पुर्व) मुंबई ४००१०१ यांना पै. मारूतराव रावजी लांडगे आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र, भोसरी, हे अटी व शर्ती घालून चालविण्यात दिले आहे. एकूण प्रशिक्षणार्थी संख्येच्या ६० टक्के मुलांना त्यांना प्रशिक्षण देण्याची मुभा दिली आहे. एकूण प्रशिक्षणार्थी संख्येच्या ४० टक्के मुले महापालिका शाळेतील घ्यावेत अशी अट घातली आहे. संबंधित क्रीडा शिक्षकांशी समन्वय साधून खेळासाठी पात्र विद्यार्थ्यांची निवड करण्याची सूचना दिली आहे. या खेळाडूंना मोफत प्रशिक्षण देणे बंधनकारक राहील, या अटीवर चालविण्यास दिले आहे. त्या अटी व शर्तीनुसार सदर संस्थेस १० वर्षे कराराने हे प्रशिक्षण केंद्र चालविण्यास दिले आहे. महापालिका सभेची मान्यता आवश्यक होती. महापालिका सभेच्या प्राप्त अधिकारांतर्गत प्रशासक तथा आयुक्त शेखर यांनी त्याला मंजुरी दिली आहे. संबंधित संस्था महापालिकेने घालून दिलेल्या अटी पाळतील का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे



### स्थानिक खेळाडू घडावेत...

**.शहरातील मैदाने खासगी संस्थांना चालविण्यास दिल्यानंतर महापालिकेने घालून दिलेल्या नियमांचा त्यांना विसर पडत असल्याचे दिसते. स्थानिक खेळाडू घडविण्याच्या उद्देशाचा या संस्था बगल देतात, असे शहरातील खेळाडूंचे म्हणणे आहे. त्यामुळे अशा संस्थांना मैदाने देताना त्यांच्याकडून शहरातील किती नामांकित खेळाडू घडले? या बाबतचा अहवाल घेणे आवश्यक आहे. तसेच या मैदानावर काही तास सरावासाठी स्थानिक खेळाडूंना उपलब्ध करून देण्याची मागणी खेळाडूंकडून होत आहे. पैसे खर्च करणार प्रकल्प उभारणार महापालिका आणि चालवण्यासाठी देणार खासगी संस्थेला... हा प्रकार योग्य नाही, असा दावा क्रीडा क्षेत्रातून केला जात आहे.**

# विलास लांडेंची नाराजी दूर; आढळराव पाटील यांचा दावा!

### लोकसभा निवडणूक रणसंग्राम : शिरूरमध्ये महायुतीची ताकद वाढली

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**अजित पवार यांचे कट्टर समर्थक माजी आमदार विलास लांडे नाराज नाहीत, असा दावा शिरूर लोकसभेचे राष्ट्रवादीचे उमेदवार शिवाजी आढळराव पाटील यांनी केला आहे. शिरूर लोकसभेसाठी विलास लांडे ही इच्छुक होते. मात्र त्यांना डावलण्यात आल्यापासून ते प्रचारात फारसे सक्रिय दिसले नाहीत. म्हणूनच कदाचित आढळरावांनी लांडेंची भेट घेतली. या भेटीनंतर आढळरावांनी लांडे नाराज नसल्याचं म्हटलं आहे.**



उमेदवारी ज्यांना भेटेल त्याचा प्रचार करायचं, असं आमच्या दोघांमध्ये ठरलं होतं. त्यानुसार मला उमेदवारी मिळाल्यानं आता लांडे माझा प्रचार करतील, असा दावा आढळराव पाटील यांनी केला आहे. मात्र विलास लांडे अद्याप त्यांची भूमिका प्रसारमाध्यमांसमोर जाहीर केलेली नाही. त्यामुळं ते आढळरावांचा प्रचार करणार का? हा प्रश्न कायम आहे.

### काय म्हणाले आढळराव पाटील?

शिवाजीराव आढळराव पाटील म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आमचे सहकारी विलास लांडे यांनी कधीही मला प्रवेशासाठी विरोध केला नाही. ते इच्छुक होते हे मान्य आहे. त्याच्यामध्ये काय गैर नाही पण जेव्हा आमच्या नेत्यांनी, अजित दादांनी सांगितलं. त्यावेळी त्यांनी प्रवेश आणि उमेदवारी मान्य केली होती. विलास लांडे नाराज असल्याच्या चर्चांना काहीही अर्थ नाही. ज्यावेळी नाराजीच्या बातम्या आल्या त्यावेळी आम्ही एकमेकांच्या संपर्कात होतो. त्यांच्या भागात आल्याने त्यांची भेट घेतली आहे. निवडणुकीचं नियोजन कसं करायचं?, प्रचाराचं नियोजन कसं करायचं?, या संदर्भात चर्चा झाली आहे.

# रोजगारासाठी मोदींना जाब विचारा!

## » शरद पवार यांचे आवाहन : 'अस्वस्थ तरुणाई, आश्वासक साहेब' ला प्रचंड प्रतिसाद

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या (आयएलओ) अहवालानुसार भारतामध्ये ८३ टक्के युवक बेकार आहेत. सत्तेवर येण्यापूर्वी नरेंद्र मोदी यांनी दर वर्षी दोन कोटी रोजगार देण्याचे आश्वासन दिले होते. प्रत्यक्षात गेल्या नऊ वर्षात केवळ सात लाख जणांना नोकऱ्या मिळाल्या आहेत.**



त्यामुळे तरुणांमध्ये अस्वस्थता आहे. या बेरोजगारीसंदर्भात सरकारला जाब विचारण्याबरोबरच प्रसंगी संघर्ष करण्याची तयारी ठेवावी लागेल, असे आवाहन ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी शनिवारी युवकांशी संवाद साधताना केले.अखिल भारतीय शिवमहोत्सव समितीच्या वतीने 'अस्वस्थ तरुणाई, आश्वासक साहेब' कार्यक्रमांतर्गत शरद पवार यांनी तरुणांशी संवाद साधला. त्या वेळी पवार बोलत होते. पुण्यश्लोक अहल्यादेवी होळकर यांचे वंशज भूषणसिंह होळकर, आमदार रवींद्र धंगेकर, अशोक पवार, पुरुषोत्तम खेडेकर, डॉ. कुमार सप्तर्षी, आबेदा इनामदार, प्रशांत जगताप, दीप्ती चवधरी, मिलिंद पवार, मोहन जोशी, अंकुश काकडे, चंद्रकांत मोकाटे, समितीचे अध्यक्ष विकास पासलकर आणि विराज काकडे या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमाला युवकांनी प्रचंड गर्दी केल्यामुळे अनेकांना व्यासपीठावर बसू द्यावे, असे खुद्द शरद पवार यांनीच संयोजकांना सांगितले.राज्य सेवा आयोगामार्फत घेतल्या जाणाऱ्या परीक्षांतून जागा वाढवल्या पाहिजेत. परीक्षांचे शुल्क कमी करावे. भ्रष्टाचाराबाबत नवीन कायदे करावेत. कंत्राटी पद्धतीद्वारे पद भरती बंद केली पाहिजे. बार्टी, आर्टी, सारथी या सामजिक संस्थांना सक्षम केले पाहिजे. महाराष्ट्रामध्ये उद्योग वाढवले पाहिजे, कारखानदारी वाढवली पाहिजे. सामंजस्याने प्रश्न सोडवू. मी तुमच्याबरोबर आहे, असे सांगून पवार यांनी युवकांना आश्वस्त केले.

### निवडणूक आयोगाचे नियोजन चुकले...

» निवडणुका एप्रिलमध्ये होणार, हे राज्य सेवा परीक्षा आयोगाला (एमपीएससी) माहीत असताना २८ एप्रिल ही परीक्षेची तारीख जाहीर कशी केली, असा प्रश्न गेल्या वर्षी तरुणीवर होणारा हल्ला परतवून लावणाऱ्या लेशपाल जवळगे या युवकाने विचारला. त्यासंदर्भात पवार म्हणाले की, निवडणुकीच्या तारखा निवडणूक आयोग ठरवते. याचा विचार त्यांनी केला पाहिजे. तरुण दोन वर्षे अभ्यास करत आहेत. पालक त्रास सहन करून मुलांना पाठिंबा देतात. चुकीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने ठरवल्यामुळे सर्व विद्यार्थ्यांचा खर्च वाढतो. त्यांना नैराश्य येते. त्यामुळे शहाणपणाने असे कार्यक्रम निवडणूक आयोगाने आखणे गरजेचे आहे.

### स्पर्धा परीक्षा वयोमर्यादा वाढवता येईल...

» स्पर्धा परीक्षांसाठी वय वाढवून देण्याच्या मागणीसंदर्भात पवार म्हणाले की, राजस्थान सरकार वयाची मर्यादा वाढवून देऊ शकते तर आपले सरकार का नाही करत? सगळे प्रश्न सुटतील असे नाही. पण आपले प्रश्न मांडू. निवडणूक आचारसंहिता असल्याने सरकार काही निर्णय घेऊ शकत नाही. पण, राज्यपाल निर्णय घेऊ शकतात. आपण निवेदन तयार करा. यासंदर्भात मी भेट घेऊन राज्यपालांना निर्णय घेण्याची विनंती करेन. दरम्यान पुरोगामी असलेले कॉंग्रेस-राष्ट्रवादी सत्ता आल्यानंतर पुरोगामी चळवळीतील लोकांना का विसरते, या प्रश्नासंदर्भात पवार यांनी थेट उत्तर देणे टाळले.

# मोहोळांच्या विजयासाठी महायुती मैदानात

## » निवडणूक रणसंग्राम : 'चला भेटूया, मताधिक्य गाठूया'चा नारा

।भोसरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महायुतीचे अधिकृत उमेदवार मुरलीधर मोहोळ यांना विजयी करण्यासाठी पुण्यात महायुतीच्या नेत्यांनी चांगलीच कंबर कसली आहे. मुरलीधर मोहोळ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नेत्यांच्या भेटीगाठीसह नागरिकांच्या भेटीगाठीही घेतांना दिसत आहेत.**



तर दुसऱ्या बाजूला महायुतीतील घटक पक्ष देखील मोहोळांच्या प्रचारासाठी मैदानात उतरले आहेत. अशातच काल पुणे लोकसभा मतदारसंघातील भाजप-महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारासाठी माजी आमदार दिवंगत विनायक निम्हण यांच्या मित्र परिवाराचा चला भेटुया, मताधिक्य गाठुया स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता.

'विनायक आबा निम्हण' यांनी शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघाचं याआधी तीन वेळा प्रतिनिधित्व केलं आहे. त्यामुळे त्यांचा प्रभाव अजूनही मतदारसंघात पहिल्या सारखा तसाच दिसून येत आहे. याच पार्श्वभूमीवर माजी नगरसेवकर सनी निम्हण यांनी 'चला भेटूया, मताधिक्य गाठूया' हा स्नेहमेळाव्याचं आयोजन केलं होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सलग तिसऱ्यांदा पंतप्रधान करून विकसित पुण्याचं स्वप्न गाठण्यासाठी महायुतीच्या पाठीशी मतदानरूपी भक्कम उभे राहण्याचा निर्धार यावेळी तिन्ही पक्षांच्या वतीने करण्यात आला.

यावेळी भाजप शहाराध्यक्ष धीरज घाटे, पिंपरी-चिंचवडचे शहराध्यक्ष शंकर जगताप, राष्ट्रवादीचे शहाराध्यक्ष दीपकभाऊ मानकर, दत्तात्रय गायकवाड, बाबुराव चांदेरे, मुकारीअण्णा अलगुडे, श्री. दत्ताभाऊ सागरे, श्री. अमोल बालवडकर, विकासनाना दांगट, प्रकाश ढोरे, राघवेंद्रबापू मानकर, विनोद ओरसे, प्रल्हाद सायकर, गणेश कळमकर, बोरावके काका, प्रितीताई शिरोळे, रोहिणीताई चिमटे, ॲड. नितीन कोकाटे, भगवानतात्या निम्हण, आबासाहेब सुतार, गोविंदशेठ रणपिसे, खंडूशेठ आरगडे, ज्ञानोबा निम्हण, अशोकराव मानकर, बाबाजी वाळुंज, भगवानराव कदम, मारुती कोकाटे, सुहास पटवर्धन, विकास रानवडे, समाधान शिंदे यांच्यासह स्व. आबांच्या मित्र परिवारतील विविध पक्षातील पदाधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. मुरलीधर मोहोळ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नेत्यांच्या भेटीगाठीसह नागरिकांच्या भेटीगाठीही घेतांना दिसत आहेत.

### मोहोळांना विजयी करण्याचे आवाहन...

» दरम्यान, मुरलीधर मोहोळ यांना विजयी करण्यासाठी गेल्या काही दिवसापासून आमदार सिद्धार्थ शिरोळे जोरदार प्रयत्न करतांना दिसत आहेत. मोहोळ यांच्या प्रचारासाठी शिरोळे मतदारसंघ पिंजून काढतांना दिसत आहेत. यावेळी नागरिकांच्या भेटीगाठी घेऊन अण्णांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन करतांना दिसत आहेत. अशातच शिरोळे यांनी अंकुरा हॉस्पिटल येथे भेट देऊन डॉक्टर व कर्मचारी यांच्यासोबत चाय पे चर्चा केली. तसेच विकसित भारतासाठी मोदींना पंतप्रधान करण्यासाठी मोहोळांना विजयी करण्याचेही त्यांनी आवाहन केले.

# मंगलदास बांदल यांचा पत्ता कट!

## खा. अमोल कोल्हे यांच्या फायद्याचा : शिरूर मध्ये राजकीय गणिते बदलणार!

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**वंचित बहुजन आघाडीने शिरूर लोकसभेची मंगलदास बांदल यांची उमेदवारी रद्द केली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटल्याने तसेच बारामती लोकसभेबाबत वंचितच्या निर्णयाशी सहमती न दाखविल्याने उमेदवारी रद्द केल्याचे समजत आहे. बांदल लोकसभेच्या आखाड्यातून बाहेर गेल्याने त्याचा फायदा महाविकास आघाडीला म्हणजेच खासदार डॉ. अमोल कोल्हे यांना होणार आहे. वंचितमुळे महाविकास आघाडीच्या बाजूचा मोठा मतदार हातातून निसटला होता. मात्र आता मतांचे हे ध्रुवीकरण थांबणार असल्याचे चित्र आहे.**





महाविकास आघाडीमध्ये जागांच्या वाटपाचा तिढा न सुटल्याने वंचित बहुजन आघाडीने स्वतंत्र मार्ग धरला आहे. राज्यातील काही लोकसभा मतदारसंघात त्यांनी आपले उमेदवार उभे केले आहेत. वंचितचा उमेदवार उभा राहिल्यास मतांचे ध्रुवीकरण होऊन त्याचा फटका महाविकास आघाडीला बसतो असे राजकीय जाणकार गणित मांडत आहे. त्यामुळे त्याचा अप्रत्यक्ष फायदा महायुतीला पर्यायाने भाजपाला होतो. त्यामुळे वंचित बहुजन आघाडी आपल्या सोबत ठेवावा असा सूर महाविकास आघाडीत यंदा घुमला. मात्र जागा वाटपाच्या तिढ्यात चर्चा फिस्कटली आणि वंचितने आपले उमेदवार घोषित केले. शिरूर लोकसभेत मंगलदास बांदल यांची उमेदवारी घोषित केल्याने या मतदारसंघातील राजकीय गणिते देखील बदलतील अशी चर्चा आहे.

शिरूर लोकसभा मतदारसंघात खासदार डॉ. अमोल कोल्हे यांना पराभूत करण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मनावर घेतले आहे. त्यासाठी त्यांना टफ फाईट देणारा उमेदवार म्हणून माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांना पक्ष प्रवेश देऊन उमेदवारी देखील जाहीर केली. कोल्हे यांनी राष्ट्रवादीच्या फुटीत खासदार शरद पवार यांची साथ न सोडल्याने त्यांच्या बाबत सहानूभुतीची लाट तयार झाली आहे. मात्र या मतदारसंघात वंचितने बांदल यांच्या रूपाने उमेदवार दिल्याने खासदार कोल्हे यांच्या पुढे अडचणी निर्माण झाल्या होत्या. बांदल यांना मानणारा वर्ग मोठा आहे. त्यामध्ये वंचितच्या लोकांची मदत झाली असती. त्यामुळे त्याचा फटका खासदार अमोल कोल्हे यांना बसेल असे सांगितले जात होते. गेल्या लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवाराला ३८ हजार मते पडली होती. ही मते विरोधात गेल्यास त्याचा फटका कोल्हे यांना बसणार होता. मात्र कोल्हे यांची ही नामुष्की टळणार आहे. बांदल यांनी पक्ष विरोधी नाराजी दर्शविल्यामुळे वंचित कडून त्यांची उमेदवारी रद्द करण्यात आली आहे. बांदल यांनी वंचितच्या साथीने महाविकास आघाडीच्या उमेदवारीची मते खाल्ली असती. मात्र आता ते झाल्याने पिछाडीवर गेलेले कोल्हे सध्या तरी पुन्हा राजकीय सेफ झोन मध्ये आल्याचे चित्र आहे.

### वंचित उमेदवाराच्या शोधात...

» शिरूर लोकसभा मतदारसंघात गेल्या निवडणुकीत राहुल ओव्हाळ यांनी निवडणूक लढवली होती. त्यांना ३८ हजार मते पडली होती. या वेळी मंगलदास बांदल यांना उमेदवारी दिली होती. मात्र ती देखील रद्द झाली. सध्या वंचित कोणाच्या गळ्यात उमेदवारीची माळ टाकणार हे पाहावे लागणार आहे. वंचितचे अनेक पदाधिकारी गेल्या वर्षभरा पक्षाला सोडून गेले होते. त्यामुळे आता कोणाला उमेदवारी मिळेल हे पाहावे लागणार आहे.

# जिजामाता रुग्णालयातील नागरिकांची गैरसोय टळणार!

## दोन शस्त्रक्रिया विभागाची सुविधा मिळणार : वैद्यकीय विभागाची तयारी

। पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या जिजामाता रुग्णालयात दोन शस्त्रक्रिया विभागाची (ओटी) सुविधा मिळणार आहे. सध्या एक शस्त्रक्रिया विभाग सुरू आहे. वाढती रुग्ण संख्या पाहता आणखीन दोन विभाग पुढील आठवड्यात सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रसुती व इतर किरकोळ शस्त्रक्रियासाठी असणारी वेटिंगची गैरसोय थांबणार आहे.**




> **महापालिका वैद्यकीय विभागाच्या वरिष्ठांच्या सकारात्मक भूमिकेमुळे रुग्णालयात विविध सुविधा प्राप्त होत आहेत. सध्या रुग्णालयात एक शस्त्रक्रिया विभाग आहे. पुढील आठवड्यात दोन शस्त्रक्रिया विभाग होणार आहेत. त्यामुळे रुग्णांना अधिक चांगले उपचार देण्यास मदत होणार आहे.**
>
> **-डॉ. सुनिता साळवे,**
> ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी, जिजामाता रुग्णालय

जिजामाता रुग्णालयात प्राथमिक उपचारासह प्रसूतीसाठी येणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक आहे. सध्या रुग्णालयात दिवसाकाठी ६०० रुग्णांची उपचारासाठी नोंद होत आहे. १३० बेडचे हे रुग्णालय असून १०० रुग्ण उपचारासाठी रुग्णालयात दाखल (अ‍ॅडमीट) होतात. या रुग्णालयात सध्या दहा बेडचा अति दक्षता विभाग आहे. यामध्ये दोन - तीन बेड अपवाद वगळता उर्वरीत बेडवर उपचारासाठी रुग्ण दाखल असतात. रुग्णालयात महापालिका प्रशासनाच्या वतीने सुविधा पुरविल्या जात आहेत. पुर्वी दुर्बीण उपलब्ध करून देण्यात आली न्हवती. सध्या एक दुर्बिण मिळाल्यामुळे दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रियेचा मार्ग मोकळा झाला आहे. रुग्णालयात एकच शस्त्रक्रिया विभाग आहे. रुग्णांची वाढती संख्या पाहता शस्त्रक्रिया विभाग वाढविणे गरजेचे होते. त्यानुसार रुग्णालयाकडून मागणी करण्यात आली होती. पुढील आठवड्यात दोन शस्त्रक्रिया विभाग सुरू होईल, अशी माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली.

# राजकीय विरोधक शत्रूच असणं गरजेचं नसतं




**विरोधी मत किंवा विचारसरणी बाळगणारी व्यक्ती शत्रू नसते. तिचा केवळ दृष्टिकोन वेगळा असतो. आपण एकतर तो बदलण्याचा प्रयत्न करू शकतो, त्यांची बाजू पटली तर स्वीकारू शकतो किंवा दोघांनाही चर्चेनंतर एकमतावर येता आलं नाही, तर व्यक्ती, विचार, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा आदर करून मतांवर ठाम राहू शकतो.**

राजकारणात आज हा समंजसपणा दुर्मीळ होताना दिसतो, मात्र काही वर्षांपूर्वीपर्यंत अशी स्थिती नव्हती. एकाच कुटुंबातील सदस्य भिन्न विचारसरणीच्या पक्षांत कार्यरत असत. राजकारणाच्या मैदानात परस्परांविरुद्ध शड्डू ठोकत, पण राजकीय जीवनातील भूमिका कधीही त्यांच्या नात्यांच्या आड आल्या नाहीत. अशात आता नणंद-भावजय असलेल्या सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार बारामतीत लोकसभा मतदारसंघाच्या रिंगणात परस्परांविरोधात उभ्या ठाकल्या आहेत.एकाच कुटुंबात परस्परविरोधी विचारसरणीच्या राजकीय पक्षांचे नेते असल्याचं ठळक उदाहरण म्हणजे मध्य प्रदेशच्या ग्वाल्हेरमधील सिंदिया अर्थात शिंदे कुटुंब. महाराज जिवाजीराव यांच्या पत्नी राजमाता विजया राजे शिंदे यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीची सुरुवात केली, काँग्रेसच्या खासदार म्हणून. काँग्रेसच्या तिकिटावर त्या दोनदा लोकसभेत निवडून गेल्या. नंतर मात्र त्या जनसंघाशी जोडल्या गेल्या. कालांतराने भारतीय जनता



पक्षाच्या एक प्रमुख नेत्या म्हणून त्या ओळखल्या जाऊ लागल्या. दुसरीकडे त्यांचे पुत्र माधवराव शिंदे १९७१ मध्ये जनसंघाच्या तिकिटावर निवडून आले, मात्र १९८०च्या सुमारास त्यांनी पक्षांतर केले आणि काँग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यांचे पुत्र ज्योतिरादित्य शिंदेही काँग्रेसचे खासदार होते, मात्र २०२० मध्ये त्यांनी भारतीय जनता पक्षाची वाट धरली. दरम्यानच्या काळात विजया राजेंच्या कन्या वसुंधरा राजे मात्र आईच्या पावलावर पाऊल टाकत भाजपबरोबरच राहिल्या. राजस्थानच्या मुख्यमंत्रीपदापर्यंत पोहोचल्या. कुटुंबात असे राजकीय मतभेद असतानाही या कुटुंबाने आपल्या संस्थानिक परंपरेचा आब कायम राखला.मूळचे काँग्रेसचे आचार्य कृपलानी आणि त्यांच्या पत्नी सुचेता कृपलानी हे अशा विरोधी विचारसरणीच्या कुटुंबाचे आणखी एक उदाहरण. आचार्य कृपलानी यांनी पुढे काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली आणि जनसंघाच्या पाठिंब्यावर निवडणूक जिंकले तेव्हा त्यांच्या पत्नी सुचेता कृपलानी काँग्रेसमध्ये होत्या आणि त्या उत्तर प्रदेशात मुख्यमंत्रीही होत्या. एकाच कुटुंबातील दोन व्यक्ती दोन टोकाच्या विचारसरणीच्या पक्षांत असू शकतात आणि तरीही गुण्यागोविंदाने नांदू शकतात, हे त्यांनी सिद्ध केले. सध्या खडसे कुटुंबातही असाच पेच निर्माण झालेला दिसतो. देवेंद्र फडणवीस यांच्यावर नाराज होऊन भाजपमधून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आलेले एकनाथ खडसे यांच्या स्नुषा रक्षा खडसे या मात्र अद्यापही भाजपमध्येच आहेत. त्यांना रावेर मतदारसंघातून उमेदवारीही मिळाली आहे. आता खडसे आपल्या सुनेच्या विरोधात प्रचार करणार का, असा प्रश्न तिथे निर्माण झाला आहे. पण सध्या सर्वाधिक चर्चेत आहेत, ते पवार कुटुंब आणि बारामती मतदारसंघ. पवार कुटुंबातील कौटुंबिक जिव्हाळा महाराष्ट्र नेहमीच पाहत आला होता. सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार यांच्यातील स्नेहबंध प्रसारमाध्यमे आणि समाजमाध्यमांवर अनेकदा पाहायला मिळाले होते.अजित पवार यांनी फडणविसांबरोबर घेतलेली पाहाटेची शपथ आणि त्यानंतर पवार यांची 'घरवापसी' त्यावेळी सुप्रिया सुळे यांच्या प्रतिक्रिया हा साराच चर्चेचा विषय ठरला होता. तेव्हा जे टळले ते आता राष्ट्रवादीत फूट पडून अधिक मोठ्या प्रमाणात जगासमोर आले आहे. पवार कुटुंबातील पुढच्या पिढीतील रोहित पवार, पार्थ पवार यांच्यासह राजकारणात कधीही कार्यरत नसलेले पवार कुटुंबातील अन्य सदस्यही आता या वादात उतरलेले दिसतात. संसदेत सत्ताधाऱ्यांना सडेतोड आणि मुद्देसूद प्रश्न विचारणाऱ्या सुप्रिया सुळे आणि बारामतीत तळागाळापर्यंत संपर्क असलेल्या, तिथल्या सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या सुनेत्रा पवार यांपैकी कोण जिंकणार याविषयी केवळ बारामतीलाच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राला उत्सुकता आहे. सक्रिय राजकारणात प्रत्यक्ष कार्यरत असल्याचा प्रदीर्घ अनुभव सुप्रिया यांच्या पाठीशी आहे, तर अजित पवार यांचे बारामतीत कार्यकर्ता स्तरापर्यंत असलेले वर्चस्व ही सुनेत्रा पवारांसाठी जमेची बाजू आहे.

## संपादकीय »

### प्रवक्त्यांची पक्षांतरे!


***राजकीय पक्षाचे प्रवक्तेपद मिळणे म्हणजे पक्षाची ध्येयधोरणे मुखोद्गत असल्याची पावती आणि पक्षनिष्ठेला दाद ही समजूत अलीकडे खोटी ठरते की काय अशी शंका वारंवार येऊ लागली आहे.***

राजकीय पक्षाचे प्रवक्तेपद मिळणे म्हणजे पक्षाची ध्येयधोरणे मुखोद्गत असल्याची पावती आणि पक्षनिष्ठेला दाद ही समजूत अलीकडे खोटी ठरते की काय अशी शंका वारंवार येऊ लागली आहे. याला कारण पक्षाच्या प्रवक्त्यांचेच होणारे पक्षांतर. ताजा संदर्भ आहे तो गौरव वल्लभ यांचा. आजवर अनेक व्यासपीठांवरून काँग्रेसची बाजू हिरिरीने मांडणारे हे अर्थशास्त्राचे प्राध्यापक रातोरात भाजपमध्ये प्रवेश करते झाले. ही कृती करताना त्यांनी केलेले वक्तव्यही मोठे मजेशीर. काँग्रेसशी आघाडी केलेल्या डीएमकेच्या एका नेत्याने सनातन धर्माविषयी केलेले वक्तव्य. काँग्रेसच्या काही नेत्यांकडून त्याची केली गेलेली पाठराखण, राम मंदिराच्या मुद्द्यावर पक्षाने घेतलेली अलिप्ततावादी भूमिका, हे सारे दोन-तीन महिन्यांपूर्वीचे मुद्दे, पक्षाच्या सर्वोच्च नेत्यांकडून उद्योगपतींना केले.

आयकर विभाग आणि 'ईडी' अर्थात सक्तवसुली संचालनालयाकडून विरोधी पक्षांवर वा त्यांच्या नेत्यांवर अलीकडे होत असलेल्या कारवायांमध्ये, निवडणुकांदरम्यान निष्पक्षपातीपणाच्या तत्त्वास बाधा आणण्याची क्षमता आहे.' असे मत किमान चौघा माजी केंद्रीय निवडणूक आयुक्तांनी व्यक्त केल्याची बातमी 'इंडियन एक्स्प्रेस'ने हे एप्रिलरोजी दिली.

## निवडणुकीतला निष्पक्षपातीपणा टिकू शकतो

एक मीही होतो आणि वृत्तपत्राकडे माझे मत व्यक्त करताना मी 'माझे नाव छापू नका' अशी अटही घातली नव्हती. पण दोघा माजी निवडणूक आयुक्तांनी अनामिक राहाणे पसंत केले. कर-थकबाकीच्या मागण्या व त्यावरील कारवाई निवडणूक जाहीर झाल्यानंतरच का केल्या जाताहेत, निवडणूक प्रक्रिया पार पडेपर्यंत त्यासाठी थांबता येणार नव्हते का, हे प्रश्न खरे तर केंद्रीय निवडणूक आयोगाने विचारले पाहिजेत, असे मत या दोघा अनामिकांपैकी एकाने व्यक्त केले आहे.एखाद्या पक्षाची बँक खाती कर-मागण्यांसाठी गोठवण्याचा प्रकार ऐन निवडणूक काळात यंत्रणांकडून घडतो, हे समन्यायीपणाच्या तत्त्वाला हरताळ फासणारे ठरते, असे मत दुसऱ्याने व्यक्त केले. अगदी राष्ट्रीय सुरक्षेचा मुद्दा असेल तर निवडणूक आयोगाने प्रश्न न विचारणे योग्य; पण सध्या परिस्थिती तशी नाही, असे या माजी आयुक्तांचे मत होते. पक्षाची बँकखाती गोठवून तुम्ही एखाद्या पक्षाने अन्य पक्षांप्रमाणेच



प्रचार करावा अशी अपेक्षा करू शकत नाही, इथेच निष्पक्षपातीपणा धुडकावला जातो, असे तिसऱ्या माजी आयुक्तांचे म्हणणे आहे.निवडणूक आचारसंहिता लागू असतानाच्या काळात 'जे काही निवडणुका संपेपर्यंत थांबू शकते त्यासाठी प्रतीक्षा करणे आवश्यक आहे' असे तत्त्व निवडणूक आयोगाकडून नेहमी पाळले जाते किंवा जात होते. अमुक निर्णय वा कृती पुढे ढकलण्यामुळे कधीही भरून न येणारे नुकसान होईल का, असा प्रश्न यासाठी विचारला जाई. सध्याच्या दोन प्रकरणांमध्ये – दोन मुख्यमंत्र्यांची अटक आणि मुख्य विरोधी पक्षाची खाती गोठवण्याची (आता सर्वोच्च न्यायालयाने काहीसा दिलासा दिल्यामुळे निष्प्रभ ठरलेली) कृती – या दोन्ही कारवायांसाठी निवडणुका संपेपर्यंत उशीर असता तर, 'भरून न येणारे नुकसान' काहीच दिसत नाही, असे माझे मत आहे. उलटपक्षी निवडणुकीच्या प्रचारात गळचेपी करून संबंधित पक्षांचे शारीरिक आणि आर्थिक नुकसान केले जात आहे.

गेल्या लोकसभा निवडणुकीत (२०१९ मध्ये) विरोधी पक्षांनी सत्ताधारी पक्षाकडून केंद्रीय यंत्रणांचा गैरवापर सुरू असल्याचा आरोप केल्यानंतर, निवडणूक आयोगानेच पुढाकार घेऊन 'ईडी'ला निष्पक्षपातीपणे काम करण्यास सांगितल्याची उदाहरणे आहेत. निवडणूक आयोगाची भाषा नेहमीच संयत असते- "निवडणूक आयोग जोरदारपणे सल्ला देऊ इच्छितो की निवडणूक काळात सर्व अंमलबजावणीच्या कृती... पूर्णपणे तटस्थ, निष्पक्षपाती आणि भेदभावरहित असाव्यात," असे शब्द २०१९ च्या या सल्लापत्रात निवडणूक आयोगाने वापरले होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।<br>
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।<br>
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# बबनराव घोलप शिवसेना शिंदे गटात

## श्रीकांत शिंदे यांची लोकसभेची उमेदवारी अद्याप जाहीर नाही

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**नाशिक लोकसभा मतदारसंघ शिवसेनेला मिळणार की राष्ट्रवादीला मिळणार? याची चर्चा सुरू असतानाच आज शिंदे गटाने उबाठा गटाला मोठा धक्का दिला. पाच वेळा आमदार राहिलेले माजी मंत्री बबनराव घोलप, माजी आमदार संजय पवार आणि आरपीआयचे अहमदनगर जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब पगारे यांनी आज शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले की, बबनराव घोलप यांनी आम्हाला तिकडचे काही अनुभव सांगितले.**



आमचेही तसेच काही अनुभव होते. आता त्यांनी बाळासाहेबांच्या विचारांवर निष्ठा दाखवून आमच्याबरोबर येण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र त्यांनी स्वतःसाठी काहीही न मागता, त्यांच्या समाजाला न्याय देण्याची भूमिका बोलून दाखवली. त्यांनी याआगोदरच निर्णय घ्यायला हवा होता. पण उशीरा का होईना, त्यांनी योग्य निर्णय घेतला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोलप यांचे स्वागत करत असताना उबाठा गटावरही निशाणा साधला. ते म्हणाले, “बबनराव घोलप आमच्यात आल्यामुळे उद्यापासून त्यांना कचरा असे संबोधले जाईल. त्यांना गद्दर म्हटले जाईल.” मुख्यमंत्र्यांच्या या विधानानंतर सर्व उपस्थितांमध्ये हशा पिकला.मुख्यमंत्री शिंदे यांचे सुपुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांची लोकसभेची उमेदवारी अद्याप जाहीर केली नाही.

याबाबत प्रश्न विचारला असता, “आधी लगीन कोंढाण्याचं, मग रायबाचं”, असा डायलॉग त्यांनी मारला. आधी सर्व सहकाऱ्यांची यादी जाहीर केली. त्यानंतर श्रीकांतचे नाव जाहीर करेल. माझ्याजागी दुसरा कुणी असता तर पहिल्याच यादीत मुलाचे नाव जाहीर केले असते. पण मी कार्यकर्त्यांचा नेता असल्यामुळे आधी कार्यकर्त्यांचे काम करतो.दरम्यान बबनराव घोलप यांनी उबाठा गट सोडत असताना शिवसेनेचे सचिव मिलिंद नार्वेकर यांच्यावर टीका केली. “मिलिंद नार्वेकर कोण आहेत? त्यांचे ऐकून मला पक्षातून बाहेर काढले. नार्वेकरांमुळे अनेकजण पक्ष सोडून गेले आहेत. मी शिर्डी लोकसभा मतदारसंघात पक्ष वाढवला. मात्र मिलिंद नार्वेकर यांचे ऐकून मला अचानक बाजूला सारण्यात आले. एकनाथ शिंदे हे बाळासाहेब ठाकरे यांचे विचार आणि वारसा घेऊन पुढे जात आहेत. यापुढे त्यांच्याबरोबर मी काम करणार आहे. जर त्यांनी बाळासाहेबांचे विचार सोडले, तर त्यांनाही सोडेल”, अशी प्रतिक्रिया बबनराव घोलप यांनी दिली.नाशिक लोकसभा मतदारसंघ शिवसेनेला मिळणार की राष्ट्रवादीला मिळणार? याची चर्चा सुरू असतानाच आज शिंदे गटाने उबाठा गटाला मोठा धक्का दिला. पाच वेळा आमदार राहिलेले माजी मंत्री बबनराव घोलप, माजी आमदार संजय पवार आणि आरपीआयचे अहमदनगर जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब पगारे यांनी आज शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले की, बबनराव घोलप यांनी आम्हाला तिकडचे काही अनुभव सांगितले. आमचेही तसेच काही अनुभव होते. आता त्यांनी बाळासाहेबांच्या विचारांवर निष्ठा दाखवून आमच्याबरोबर येण्याचा निर्णय घेतला आहे.

### सर्व सहकाऱ्यांची यादी जाहीर

» आमचेही तसेच काही अनुभव होते. आता त्यांनी बाळासाहेबांच्या विचारांवर निष्ठा दाखवून आमच्याबरोबर येण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र त्यांनी स्वतःसाठी काहीही न मागता, त्यांच्या समाजाला न्याय देण्याची भूमिका बोलून दाखवली. त्यांनी याआगोदरच निर्णय घ्यायला हवा होता. पण उशीरा का होईना, त्यांनी योग्य निर्णय घेतला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घोलप यांचे स्वागत करत असताना उबाठा गटावरही निशाणा साधला. ते म्हणाले, “बबनराव घोलप आमच्यात आल्यामुळे उद्यापासून त्यांना कचरा असे संबोधले जाईल. त्यांना गद्दर म्हटले जाईल.” मुख्यमंत्र्यांच्या या विधानानंतर सर्व उपस्थितांमध्ये हशा पिकला.मुख्यमंत्री शिंदे यांचे सुपुत्र खासदार श्रीकांत शिंदे यांची लोकसभेची उमेदवारी अद्याप जाहीर केली नाही. याबाबत प्रश्न विचारला असता, “आधी लगीन कोंढाण्याचं, मग रायबाचं”, असा डायलॉग त्यांनी मारला. आधी सर्व सहकाऱ्यांची यादी जाहीर केली. त्यानंतर श्रीकांतचे नाव जाहीर करेल. माझ्याजागी दुसरा कुणी असता तर पहिल्याच यादीत मुलाचे नाव जाहीर केले असते.

# राष्ट्रवादीला रामराम, खडसे पुन्हा भाजपात जाणार

## नेत्यांच्या विरोधानंतरही खडसेंना भाजपमध्ये प्रवेश कसा मिळाला?

। सोलापूर । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे पुन्हा भाजपमध्ये प्रवेश करणार आहेत. एकनाथ खडसे यांच्या भाजप प्रवेशाचा सोहळा राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डांच्या उपस्थितीत येत्या चार-पाच दिवसात पडणार आहे.**



राज्यातल्या काही नेत्यांच्या विरोधानंतरही केंद्रीय नेतृत्व खडसेंना पक्षात घेण्यासाठी कसं राजी झालं याचं अनेकांना आश्चर्य वाटतंय. महाराष्ट्र भाजपमध्ये महत्त्वाची जबाबदारी सांभाळणारा एक नेता आणि महाराष्ट्रातून दिल्लीत जाऊन स्वत:चं अस्तित्व निर्माण करणाऱ्या एका नेत्यानं खडसेंचा भाजप प्रवेश सुकर केल्याची माहिती आहे. पण खडसेंच्या भाजप प्रवेशामुळं राज्यातील भाजपचे काही नेते नाराज होण्याची शक्यता आहे.

जळगाव जिल्ह्यात एकनाथ खडसे आणि गिरीश महाजन यांचं विळ्या-भोपळ्याचं नातं आहे. त्यामुळे खडसेंना भाजप प्रवेश महाजनांना किती रुचतो हे पाहावं लागेल. ऑक्टोबर 2020 मध्ये एकनाथ खडसेंनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर राष्ट्रवादीनं खडसेंना विधानपरिषदेची आमदारकीही दिली. पण ज्या दिवशी खडसे आमदार झाले त्या दिवशीच एकनाथ शिंदेंनी शिवसेनेत बंड केलं. खडसेंना मंत्रिपदाची आशा होती, पण मविआ सरकारच कोसळलं.ऑक्टोबर 2020 मध्ये एकनाथ खडसेंनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर राष्ट्रवादीनं खडसेंना विधानपरिषदेची आमदारकीही दिली. पण ज्या दिवशी खडसे आमदार झाले त्या दिवशीच एकनाथ शिंदेंनी शिवसेनेत बंड केलं. खडसेंना मंत्रिपदाची आशा होती, पण मविआ सरकारच कोसळलं.सध्या एकनाथ खडसे जरी शरद पवारांच्या राष्ट्रवादीत असले तरी त्यांच्याच माध्यमातून रक्षा खडसे यांची रावेर लोकसभा मतदारसंघाची उमेदवारी निश्चित झाली असल्याची चर्चा आहे. रावेरमधून गिरीश महाजन यांना हरिभाऊ जावळे यांच्या चिरंजीवाला उमेदवारी द्यायची होती. मात्र दिल्लीतील आपल्या जुन्या मित्रांचा पाठिंबा मिळवत एकनाथ खडसे यांनी रावेर लोकसभेची जागा स्वत:च्या सुनेकडे ठेवली.

### भाजपचे काही नेते नाराज

» केंद्रात दुसरी एक फळी कार्यरत असल्याचीही चर्चा सुरु झाली आहे. राज्यातल्या काही नेत्यांच्या विरोधानंतरही केंद्रीय नेतृत्व खडसेंना पक्षात घेण्यासाठी कसं राजी झालं याचं अनेकांना आश्चर्य वाटतंय. महाराष्ट्र भाजपमध्ये महत्त्वाची जबाबदारी सांभाळणारा एक नेता आणि महाराष्ट्रातून दिल्लीत जाऊन स्वत:चं अस्तित्व निर्माण करणाऱ्या एका नेत्यानं खडसेंचा भाजप प्रवेश सुकर केल्याची माहिती आहे. पण खडसेंच्या भाजप प्रवेशामुळं राज्यातील भाजपचे काही नेते नाराज होण्याची शक्यता आहे.

# काँग्रेसकडे राष्ट्रहिताची धोरणे नाहीत!

## काँग्रेसच्या जाहीरनाम्यात न्यूयॉर्क, थायलंडचे फोटो; भाजपा

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने ५ एप्रिल रोजी जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहीरनाम्यात काँग्रेसकडून मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत. या जाहीरनाम्यात अग्निवीर योजना बंद करून जुन्या पद्धतीने भरती राबविण्याचे आश्वासनासह तीस लाख युवकांना सरकारी नोकरी देण्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, काँग्रेसच्या या जाहीरनाम्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी टीका केली आहे. “काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर मुस्लिम लीगची छाप आहे”, असा हल्लाबोल पंतप्रधान मोदी यांनी केला. ते उत्तर प्रदेशमधील भाजपाच्या रॅलीला संबोधित करत होते.



“पहिली काँग्रेस आता राहिलेली नाही. लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाने प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्यावर मुस्लिम लीगची छाप असल्याचे दिसून येते. तसेच जाहीरनाम्याचा काही भागावर डाव्या विचारसरणीचा प्रभाव दिसतो आहे. काँग्रेस ज्या उमेदवाराला तिकीट देते तो उमेदवार दुसऱ्या दिवशी काँग्रेस सोडत आहे. आज उरलेल्या काँग्रेसकडे राष्ट्रहिताची काहीच धोरणे नाहीत. देशाच्या विकासासाठी काही धोरणेदेखील नाही”, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.“महात्मा गांधी यांच्यासह अनेक महान व्यक्ती काँग्रेसबरोबर जोडले गेले होते. मात्र, स्वातंत्र्य चळवळीच्या वेळी अस्तित्वात असलेली काँग्रेस दशकापूर्वीच संपली आहे. आता जी काँग्रेस राहिली, त्यांच्याकडे देशाच्या हितासाठी काहीही नाही. काँग्रेसने कधीही वंचित, शोषितांचा विचार केला नाही”, असा हल्लाबोल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची आज उत्तर प्रदेशच्या सहारनपूर येथे भव्य रॅली पार पडली. यावेळी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, “काँग्रेसने बालेकिल्ला म्हणून मानलेल्या अमेठी आणि रायबरेली या मतदारसंघातदेखील काँग्रेस उमेदवार उभे करण्याचे धाडस दाखवू शकत नाही”, असा टोला पंतप्रधान मोदी काँग्रेसला लगावला. काँग्रेसने जाहीरनाम्यात तीस लाख युवकांना सरकारी नोकरी, आरक्षणाची मर्यादा वाढवविण्याचे आश्वासन, गरीब महिलांना वर्षाला १ लाख रुपये देण्याचे आश्वासन, शेतकऱ्यांच्या सर्व गोष्टींवरील जीएसटी हटविण्याचे आश्वासन, अग्निवीर योजना बंद करून जुन्या पद्धतीने भरती राबविण्याचे आश्वासन तसेच गॅस सिलिंडरच्या दरात कपात करण्याच्या आश्वासनासह आदी मोठ्या घोषणा काँग्रेसने केल्या आहेत.काँग्रेसच्या मुख्यालयामध्ये शुक्रवारी पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. या जाहीरनाम्यात पाच न्याय आणि २५ गॅरंटी देण्यात आल्या आहेत. यामध्ये युवा, रोजगार, मजूर, महिलांना १ लाखांची मदत, शिक्षण, शेतकऱ्यांना एमएसपीची हमी यासह ३० लाख नोकऱ्या देण्याचे आश्वासन या जाहीरनाम्यात देण्यात आले आहे. मात्र भाजपाकडून काँग्रेसच्या जाहीरनाम्यावर टीका करण्यात आली. यामध्ये न्यूयॉर्क आणि थायलंड देशातील फोटो छापण्यात आले आहेत, यावरून काँग्रेस किती गंभीर आहे, हे दिसून येते, अशी प्रतिक्रिया भाजपाचे नेते सुधांशू त्रिवेदी यांनी दिली. सुधांशू त्रिवेदी यांनी पत्रकार परिषद घेऊन काँग्रेसवर टीका केली. ते म्हणाले, “मध्यंतरी काँग्रेसच्या सोशल मीडिया विभागाच्या प्रमुख म्हणाल्या की, त्यांचे सोशल मीडिया कोण हाताळते? हे त्यांना माहीत नाही. पण पक्षाचा जाहीरनामा कोण तयार करते, हे तरी पक्षाला माहीत असावे ना. जाहीरनाम्यात पर्यावरण विभागात जे फोटो छापले गेले आहेत, ते राहुल गांधींच्या आवडत्या देशाचे आहे. थायलंड हा देश राहुल गांधींचा आवडता देश आहे.”“काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले की, काँग्रेसला जेव्हा स्वातंत्र्यानंतर सत्ता मिळाली होती, तेव्हा देशात सुईचेही उत्पादन होत नव्हते. पण त्यांचे विधान असत्य आहे.

### पक्षाचा जाहीरनामा कोण तयार करते

» सीव्ही रामण यांना १९३० साली नोबल पारितोषिक मिळाले होते. भारतीय विज्ञान संस्थेची (बंगळुरू) १९०९ साली स्थापन करण्यात आली होती. पण तरी नेहरूंच्या आगमनानंतरच देशात सर्वकाही सुधारणा झाली, असे काँग्रेसचे म्हणणे आहे”, असाही आरोप त्रिवेदी यांनी केला. त्रिवेदी पुढे म्हणाले की, काँग्रेसच्या जाहीरनाम्यात चुकीचे फोटो वापरले गेले, हा मोठा विषय नाही. पण ते फोटो विदेशातले आहेत, हा चिंतेचा विषय आहे. आतापर्यंत काँग्रेस नेते विदेशात जाऊन भारत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची बदनामी करत होते. पण आता तर ते विदेशातले फोटो आणि त्यांचा जाहीरनामाच उचलत आहेत.काँग्रेसने त्यांच्या जाहीरनाम्यात जी आश्वासने दिली आहेत, ती त्यांनी स्वतःच्या शासन काळात कधीच पूर्ण केलेली नाहीत.सुधांशू त्रिवेदी यांनी पत्रकार परिषद घेऊन काँग्रेसवर टीका केली. ते म्हणाले, “मध्यंतरी काँग्रेसच्या सोशल मीडिया विभागाच्या प्रमुख म्हणाल्या की, त्यांचे सोशल मीडिया कोण हाताळते? हे त्यांना माहीत नाही. पण पक्षाचा जाहीरनामा कोण तयार करते, हे तरी पक्षाला माहीत असावे ना. जाहीरनाम्यात पर्यावरण विभागात जे फोटो छापले गेले आहेत, ते राहुल गांधींच्या आवडत्या देशाचे आहे. थायलंड हा देश राहुल गांधींचा आवडता देश आहे.”

# ‘एनआयए’च्या पथकावर जमावाचा हल्ला

## ममता बॅनर्जी यांनी तपास यंत्रणेच्या अधिकाऱ्यांनाच सुनावले

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

पश्चिम बंगालमध्ये राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या (एनआयए) पथकावर जमावाकडून हल्ला झाल्याची घटना समोर आली. भूपतीनगर बॉम्बस्फोट प्रकरणाचा तपास करण्यासाठी राष्ट्रीय तपास यंत्रणेचे एक पथक या ठिकाणी दाखल झाले असता जमावाने एनआयएच्या पथकातील वाहनांची तोडफोड करत हल्ला केला. या घटनेत दोन अधिकारी जखमी झाले.



यानंतर आता पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया देत एनआयएच्या पथकाने रात्री छापा का टाकला? एनआयएने पोलिसांची परवानगी घेतली होती का?, असे अनेक प्रश्न विचारले आहेत.“एनआयएने मध्यरात्री छापा का टाकला? त्यांनी पोलिसांची परवानगी घेतली होती का? मध्यरात्री आलेल्या कोणत्याही अनोळखी व्यक्तीला जशी प्रतिक्रिया द्यायला हवी होती, तशीच स्थानिकांनी दिली. निवडणुकीच्या आधी लोकांना अटक का करत आहेत? भाजपाला असे वाटते की ते प्रत्येक बूथ एजंटला अटक करतील? यासाठी एनआयएला काय अधिकार आहेत?”, अशा कडक शब्दात मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी खडेबोल सुनावले.मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी एनआयएच्या अधिकाऱ्यांनी भूपतीनगरमध्ये महिलांवर हल्ला केल्याचा दावा केला आहे. त्या म्हणाल्या, “एनआयएचे अधिकारी लोकांच्या घरात घुसत असतील तर तुम्हाला काय अपेक्षा आहे? भाजपाला पाठिंबा देण्यासाठी हे सर्व केले जात आहे, पण आम्ही सर्वांना आवाहन करतो की, भाजपाच्या या अशा पद्धतीच्या राजकारणाविरोधात लढा”, असे मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी म्हटले.डिसेंबर २०२२ च्या भूपतीनगर बॉम्बस्फोट प्रकरणाचा तपास करण्यासाठी राष्ट्रीय तपास यंत्रणेचे एक पथक आज (६ एप्रिल) भूपतीनगर भागात दाखल झाले होते. या बॉम्बस्फोट प्रकरणात तीन जणांचा मृत्यू झाला होता. याचा तपास एनआयएकडून सुरु आहे. या भूपतीनगर बॉम्बस्फोट प्रकरणात तृणमूल काँग्रेसच्या आठ नेत्यांची चौकशी सुरु आहे. या प्रकरणात काहींना नोटीसा देण्यात आल्या होत्या. पण ते चौकशीसाठी हजर झाले नव्हते. त्यानंतर एनआयएने त्यांना ताब्यात घेण्यासाठी हालचाली सुरु केल्या होत्या. यानंतर भूपतीनगर येथे आलेल्या एनआयएच्या पथकावर संतप्त जमावाकडून हल्ला करण्यात आला.

### वाहनांची तोडफोड करत हल्ला

» दगडफेक करत अधिकाऱ्यांच्या वाहनांची तोडफोड करण्यात आली. ही घटना ६ एप्रिल रोजी पहाटे घडली.पश्चिम बंगालमध्ये राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या (एनआयए) पथकावर जमावाकडून हल्ला झाल्याची घटना समोर आली. भूपतीनगर बॉम्बस्फोट प्रकरणाचा तपास करण्यासाठी राष्ट्रीय तपास यंत्रणेचे एक पथक या ठिकाणी दाखल झाले असता जमावाने एनआयएच्या पथकातील वाहनांची तोडफोड करत हल्ला केला. या घटनेत दोन अधिकारी जखमी झाले. यानंतर आता पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया देत एनआयएच्या पथकाने रात्री छापा का टाकला?

# अभिनेत्री आरती छाब्रियाने दिली आनंदाची बातमी

'राजा भैय्या', 'आवारा पागल दिवाना', 'तुमसे अच्छा कौन है', 'मिलेंगे मिलेंगे' अशा चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकणारी अभिनेत्री आरती छाब्रियाने आनंदाची बातमी दिली आहे. आरती आई झाली आहे, तिने एका महिन्याआधी गोंडस बाळाला जन्म दिला आहे. आरती ४१ व्या वर्षी आई झाली आहे. आरतीने ४ मार्च रोजी मुलाला जन्म दिला असून त्याचं नावही सांगितलं आहे. आरतीच्या पतीचं नाव विशारद बीडासी असून तो चार्टर्ड अकाउंटंट आहे. आरतीने मुलाचं नाव युवान ठेवलं आहे. तिने ती गरोदर असल्याची बातमी का लपवून ठेवली होती, याबद्दल 'हिंदुस्थान टाइम्स' शी बोलताना सांगितलं. "मला वाटत होतं की जेव्हा मला बाळाबद्दल सांगावसं वाटेल तेव्हाच मी सांगेन. आता मला सांगावसं वाटतंय. कारण माझ्या बाळाचा जन्म होऊन एक महिना झाला आहे," असं ती म्हणाली. तसेच सुरुवातीचे काही महिने आपण कपड्यांमुळे प्रेग्नेन्सी लपवली, असं तिने सांगितलं.आरती आणि तिच्या पतीने २०१९ मध्ये अरेंज मॅरेज केलं होतं. लग्नानंतर ते दोघे ऑस्ट्रेलियाला गेले आणि करोना आल्यामुळे तिथेच अडकले. "दूर राहणं तणावपूर्ण होतं, त्या परिस्थिती तुम्ही वेगवेगळ्या भावनांमधून जात असता त्यामुळे गर्भधारणा करू शकत नाही. मी नवीन ठिकाण आणि नवीन लोकांशी जुळवून घेण्यासाठी धडपडत होते, माझ्या शरीरातही खूप बदल होत होते," असं ती म्हणाली. तसेच ४१ व्या वर्षी बाळाला जन्म देणं हे विशीत किंवा तिशीत जन्म देण्याइतकं सोपं नाही, असंही तिने नमूद केलं."आधी माझा गर्भपात झाला होता, त्यामुळे यावेळी मी गर्भधारणेबद्दल न सांगायचं ठरवलं. मला उपचार घ्यावे लागले, तेव्हा मी गरोदर राहिले. बरेच लोक बोलतात ही अभिनेत्री आहे, हिच्याकडे पैसा आहे, त्यामुळे काही अडचण नाही. पण असं नसतं. हे उपचार आरोग्यावर परिणाम करतात. माझं वजन विचित्र पद्धतीने वाढलं, मला औषधांचे दुष्परिणाम जाणवत होते. औषधं घेऊनही मी गरोदर झाले नाही, शेवटी मी सर्व आशा सोडून दिल्या होत्या. पण नंतर मी गरोदर राहिले," असं आरती म्हणाली.'राजा भैय्या', 'आवारा पागल दिवाना', 'तुमसे अच्छा कौन है', 'मिलेंगे मिलेंगे' अशा चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकणारी अभिनेत्री आरती छाब्रियाने आनंदाची बातमी दिली आहे.

## माधुरी दीक्षितच्या मनमोहक अदा

९० च्या दशकात माधुरी दीक्षितने आपल्या अभिनयासह दमदार नृत्याने सगळ्यांवर मोहिनी घातली होती. या मराठमोळ्या अभिनेत्रीने बॉलीवूडमध्ये स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण करून चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवलं. तिला बॉलीवूडची 'धकधक गर्ल' म्हणून सुद्धा ओळखलं जातं. सध्या माधुरीने इन्स्टाग्रामवर शेअर केलेला असाच एक व्हिडीओ चर्चेत आला आहे. इन्स्टाग्राम रील्सवर अनेक गाणी व्हायरल होत असतात. सध्या आशा भोसले यांचं १९८३ मध्ये प्रदर्शित झालेलं "सलोना सा सजन है...और मैं हू" या गाण्याची नेटकऱ्यांना भुरळ पडली आहे. अगदी माधुरीला सुद्धा या गाण्यावर थिरकण्याचा मोह आवरला नाही. अभिनेत्रीने नुकताच या गाण्यावर ब्लॅक अँड व्हाइट व्हिडीओ शेअर केला आहे.आशा भोसलेंच्या या जवळपास ४० वर्षे जुन्या गाण्यावर अभिनेत्रीचा मनमोहक अंदाज पाहायला मिळत आहे. माधुरीने या व्हिडीओमध्ये इंडो-वेस्टर्न लूक करत साडी नेसल्याचं पाहायला मिळत आहे. तिच्या अदाकारीची केवळ नेटकऱ्यांनाच नव्हे तर मराठी अभिनेत्रींना देखील भुरळ पडली आहे.माधुरीच्या व्हिडीओवर क्रांती रेडकरने "ओह माय गॉड तू खरंच बेस्ट आहेस" अशी कमेंट करत लक्ष वेधून घेतलं आहे. तर अमृता खानविलकरने या व्हिडीओवर कमेंट करत "उफ...ग्रेस" असं म्हटलं आहे.

## कुठे आहे मालिनी शर्मा?



डिनो मोरिया, बिपाशा बासूची मुख्य भूमिका असलेला 'राज' चित्रपट तुम्हाला आठवत असेल. या भयपटातील रोमँटिक गाणी खूप गाजली होती. डिनो आणि बिपाशा यांच्या केमिस्ट्रीची खूप चर्चा झाली होती. या सिनेमात या दोघांव्यतिरिक्त आणखी एक अभिनेत्री होती, जिचा 'मैं तुम्हें बर्बाद कर दूंगी' हा डायलॉग खूप लोकप्रिय झाला होता. ती अभिनेत्री कोण आहे व आता कुठे आहे, याबाबत जाणून घेऊयात. 'राज'मध्ये डिनो मोरिया आणि बिपाशा बसू यांच्याशिवाय अभिनेत्री मालिनी शर्मा होती. तिने भुताची भूमिका केली होती. या चित्रपटात तिची दमदार भूमिका होती. सिनेमात डिनो व मालिनीचं अफेअर दाखवण्यात आलं होतं. दोघांमध्ये खूप इंटिमेट आणि रोमँटिक सीन शूट करण्यात आले होते. विवाहित डिनो मालिनीशी लग्न करण्यास नकार देतो आणि ती गोळी मारून आत्महत्या करते. मग ती भुताच्या रुपात त्याला व बिपाशाला त्रास देते अशी चित्रपटाची कथा होती. या चित्रपटानंतर तिच्या अभिनयाची व सौंदर्याचीही खूप चर्चा झाली.मालिनीने आपल्या करिअरची सुरुवात मॉडेलिंगपासून केली होती. तिने करिअरमध्ये अनेक टीव्ही शो आणि चित्रपटांमध्ये काम केलं. याशिवाय ती बॉम्बे वायकिंगच्या 'क्या सूरत है' या गाण्यातही दिसली होती. इतकंच नाही तर अभिनेत्रीने मिका सिंगच्या 'सावन में लग गई आग' या गाण्यात काम केलं होतं.मालिनी शर्माच्या वैयक्तिक आयुष्याविषयी बोलायचं झाल्यास तिने प्रियांशू चॅटर्जीशी लग्न केलं, पण त्यांचं नातं फार काळ टिकलं नाही. चार वर्षांनंतर त्यांचा घटस्फोट झाला. आता मालिनी शर्मा कुठे आणि काय करते याबद्दल माहिती उपलब्ध नाही.डिनो मोरिया, बिपाशा बासूची मुख्य भूमिका असलेला 'राज' चित्रपट तुम्हाला आठवत असेल. या भयपटातील रोमँटिक गाणी खूप गाजली होती. डिनो आणि बिपाशा यांच्या केमिस्ट्रीची खूप चर्चा झाली होती. या सिनेमात या दोघांव्यतिरिक्त आणखी एक अभिनेत्री होती, जिचा 'मैं तुम्हें बर्बाद कर दूंगी' हा डायलॉग खूप लोकप्रिय झाला होता. ती अभिनेत्री कोण आहे व आता कुठे आहे, याबाबत जाणून घेऊयात. 'राज'मध्ये डिनो मोरिया आणि बिपाशा बसू यांच्याशिवाय अभिनेत्री मालिनी शर्मा होती. तिने भुताची भूमिका केली होती. या चित्रपटात तिची दमदार भूमिका होती. सिनेमात डिनो व मालिनीचं अफेअर दाखवण्यात आलं होतं. दोघांमध्ये खूप इंटिमेट आणि रोमँटिक सीन शूट करण्यात आले होते.

## जॅकी श्रॉफ यांचा व्हिडीओ होतोय तुफान व्हायरल

आपल्या स्पष्टवक्तेपणामुळे, वेगळ्या अंदाजामुळे, स्टाइलमुळे ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ नेहमी चर्चेत असतात. त्यांची स्टाइल चाहत्यांना खूप आवडते. सध्या जॅकी श्रॉफ यांचा एक व्हिडीओ तुफान व्हायरल होतं आहे. या व्हिडीओमधील जॅकी श्रॉफ यांची कृती पाहून नेटकरी भडकले आहेत. त्यांना ट्रोल करत आहेत. जॅकी श्रॉफ यांचा व्हायरल व्हिडीओ 'इंस्टंट बॉलीवूड' या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे. एका कार्यक्रमासाठी जॅकी श्रॉफ दोन झाडं घेऊन जात होते. तितक्यात त्यांचे चाहते फोटो घेण्यासाठी त्यांच्याकडे धावले. जॅकी श्रॉफ यांनी सगळ्या चाहत्यांबरोबर फोटो काढले. पण यावेळी त्यांनी चाहत्यांना दिलेल्या वागणुकीने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं.या व्हिडीओत, जॅकी श्रॉफ फोटो काढण्यात आलेल्या चाहत्याला डोक्यात मारताना दिसत आहेत. तसेच इतरांना दम देताना पाहायला मिळत आहेत. जॅकी श्रॉफ यांनी चाहत्यांना दिलेल्या या वागणुकीवरून नेटकरी भडकले आहेत.एका नेटकऱ्याने लिहिलं आहे, "त्याला मारलं का? वेडेत आहेत का?" तर दुसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, "हे खूप चुकीचं आहे. तुम्ही कोणालाही मारू शकत नाही. चाहते तुमचे मित्र किंवा नातेवाईक नाहीत, ज्यांच्याबरोबर तुम्ही मस्ती कराल." तसेच तिसऱ्या नेटकऱ्याने लिहिलं, "हात लावला तर काय झालं? एवढा गर्व नाही पाहिजे." चौथ्या नेटकऱ्याने लिहिलं, "हे चुकीचं आहे. सामान्य माणसांना हे आदर देत नाहीत."सध्या जॅकी श्रॉफ यांच्या या व्हिडीओची चांगलीच चर्चा सुरू आहे. पण काही नेटकरी त्यांना आलेले जॅकी श्रॉफ यांचे चांगले अनुभव शेअर करत आहेत.आपल्या स्पष्टवक्तेपणामुळे, वेगळ्या अंदाजामुळे, स्टाइलमुळे ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ नेहमी चर्चेत असतात. त्यांची स्टाइल चाहत्यांना खूप आवडते. सध्या जॅकी श्रॉफ यांचा एक व्हिडीओ तुफान व्हायरल होतं आहे. या व्हिडीओमधील जॅकी श्रॉफ यांची कृती पाहून नेटकरी भडकले आहेत. त्यांना ट्रोल करत आहेत. जॅकी श्रॉफ यांचा व्हायरल व्हिडीओ 'इंस्टंट बॉलीवूड' या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे. एका कार्यक्रमासाठी जॅकी श्रॉफ दोन झाडं घेऊन जात होते. तितक्यात त्यांचे चाहते फोटो घेण्यासाठी त्यांच्याकडे धावले. जॅकी श्रॉफ यांनी सगळ्या चाहत्यांबरोबर

## रकुल प्रित सिंहने केली खास पोस्ट



लातूर ग्रामीणचे आमदार धिरज देशमुख यांचा आज वाढदिवस आहे. वाढदिवसानिमित्त त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. अभिनेत्री रकुल प्रित सिंगनेही धिरज यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. तिने तिच्या व जॅकीच्या लग्नसोहळ्यातील एक खास फोटो शेअर करत वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. रितेश देशमुखचे भाऊ धिरज यांची पत्नी दिपशिखा ही रकुल प्रितची सख्खी नणंद आहे. रकुल व जॅकी यांचं फेब्रुवारी महिन्यात गोव्यात लग्न झालं. लग्नाच्या कार्यक्रमातील एक फोटो रकुलने शेअर केला आहे. या फोटोत रकुल व धिरज देशमुख डान्स करताना दिसत आहेत. 'वाढदिवसाच्या शुभेच्छा, येणारं वर्ष आनंदाचं जावो आणि या वर्षात तुम्हाला हवं ते सर्व मिळो,' असं रकुलने या फोटोत धिरज देशमुखांना टॅग करत लिहिलं.रकुल व जॅकीचं लग्न २१ फेब्रुवारी रोजी गोव्यात झालं. मेहुण्याच्या लग्नासाठी धिरज देशमुख गोव्याला गेले होते. त्यांची पत्नी दिपशिखा व मुलं सर्वजण या लग्नासाठी काही दिवस गोव्यात होते.

# बटलरचं शतक कोहलीच्या शतकावर भारी!

## राजस्थानने साकारला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूवर विजय

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**आयपीएल २०२४ मधील १९ वा सामना जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात राजस्थान रॉयल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आमनेसामने होते. ज्यामध्ये राजस्थानने आरसीबीचा विकेट्सनी पराभव करत यंदाच्या हंगामातील सलग चौथा विजय नोंदवला. या सामन्यात नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने विराट कोहलीच्या नाबाद शतकाच्या जोरावर ३ बाद १८३ धावां केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना राजस्थानने जोस बटलरच्या नाबाद शतकाच्या जोरावर १९. षटकांत ४ गडी गमावून विजयावर शिक्कामोर्तब केला.**




सलामीवीर जोस बटलरच्या शानदार नाबाद शतकाच्या जोरावर राजस्थानने आरसीबीचा सहा गडी राखून पराभव केला आहे. बटलरने ५८ चेंडूचा सामना करताना ९ चौकार आणि ४ षटकारांच्या जोरावर नाबाद १०० धावा केल्या. त्याचे आयपीएल कारकीर्दीतील हे सहावे शतक आहे. राजस्थानचा या स्पर्धेतील हा सलग चौथा विजय आहे, तर आरसीबीने पराभवाची हॅट्रिक केली आहे. विराट कोहलीच्या नाबाद ११३ धावांच्या जोरावर आरसीबीने ३० षटकांत तीन गड्यांच्या मोबदल्यात १८३ धावा केल्या होत्या, मात्र बटलरचे शतक आणि कर्णधार संजू सॅमसनच्या ६९ धावांच्या खेळीच्या जोरावर राजस्थानने पाच चेंडू शिल्लक असताना चार गड्यांच्या मोबदल्यात १८९ धावा करत विजयाची नोंद केली. आरसीबीवरील या विजयासह, राजस्थान संघ चार सामन्यांत चार विजय आणि आठ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानावर पोहोचला आहे, तर कोलकाता नाइट रायडर्स (केकेआर) संघ सहा गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. १८४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना राजस्थानची सुरुवात चांगली झाली नाही आणि पहिल्याच षटकात संघाने यशस्वी जैस्वालची विकेट गमावली. यशस्वी खाते न उघडताच बाद झाला, मात्र यानंतर बटलर आणि कर्णधार संजू सॅमसन यांनी मिळून डावाची धुरा सांभाळली आणि दोन्ही फलंदाजांनी दुसऱ्या विकेटसाठी १४८ धावांची भागीदारी करून संघाच्या विजयाचा पाया रचला. अर्धशतक झळकावल्यानंतर सॅमसनने आपली विकेट गमावली, पण बटलरने शेवटपर्यंत टिकून राहून षटकार लगावत आपले शतक पूर्ण केले आणि संघाला सहा गडी राखून विजय मिळवून दिला. ज्यामुळे विराट कोहलीची शतकी खेळी व्यर्थ ठरली.या सामन्यात राजस्थानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर प्रथम फलंदाजी करताना आरसीबीने २० षटकांत ३गडी गमावून १८३ धावा केल्या होत्या. विराट कोहलीने आरसीबीसाठी शानदार शतक झळकावले. विराटने ७२ चेंडूत नाबाद ११३ धावा केल्या. आपल्या खेळीदरम्यान कोहलीने १२चौकार आणि ४ षटकार मारले. याशिवाय कर्णधार फाफ डू प्लेसिसने ३३ चेंडूत ४४ धावांची खेळी केली. फॅफने आपल्या खेळीत २ चौकार आणि २ शानदार षटकार मारले. राजस्थान रॉयल्सच्या वतीने फिरकी गोलंदाज युजवेंद्र चहलने अप्रतिम गोलंदाजी सादर केली. चहलने ४ षटकात ३४ धावा देत २ बळी घेतले. या सामन्यात चहलनेच राजस्थानला पहिले यश मिळवून दिले. चहलेशिवाय बर्गरनेही चांगली गोलंदाजी केली. बर्गरने ४ षटकात ३३ धावा देऊन एक बळी घेतला होता.

### बटलरने ठोकला विजयी षटकार

‘सलामीवीर जोस बटलरच्या शानदार नाबाद शतकाच्या जोरावर राजस्थानने आरसीबीचा सहा गडी राखून पराभव केला आहे. बटलरने ५८ चेंडूचा सामना करताना ९ चौकार आणि ४ षटकारांच्या जोरावर नाबाद १०० धावा केल्या. त्याचे आयपीएल कारकीर्दीतील हे सहावे शतक आहे. राजस्थानचा या स्पर्धेतील हा सलग चौथा विजय आहे, तर आरसीबीने पराभवाची हॅट्रिक केली आहे. विराट कोहलीच्या नाबाद ११३ धावांच्या जोरावर आरसीबीने ३० षटकांत तीन गड्यांच्या मोबदल्यात १८३ धावा केल्या होत्या, मात्र बटलरचे शतक आणि कर्णधार संजू सॅमसनच्या ६९ धावांच्या खेळीच्या जोरावर राजस्थानने पाच चेंडू शिल्लक असताना चार गड्यांच्या मोबदल्यात १८९ धावा करत विजयाची नोंद केली.

# पंड्याची हुर्यो उडवणाऱ्यांवर गांगुली संतापला

## सौरव गांगुलीने मुंबई इंडियन्सचा माजी कर्णधार रोहित शर्माचे कौतुक केले

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार सौरव गांगुली आयपीएल सामन्यांदरम्यान मुंबई इंडियन्सचा नवा कर्णधार हार्दिक पंड्याची हुर्यो उडवल्याने संतापला आहे. गांगुली हा दिल्ली कॅपिटल्स फ्रँचायझीचा संचालक आहे. त्याचा संघ रविवारी (७ एप्रिल) मुंबई इंडियन्सविरुद्ध खेळणार आहे. गांगुली अशा लोकांपैकी नाही जे गुंतागुंतीच्या प्रश्नांची उत्तरे देण्यास टाळाटाळ करतात. मुंबई इंडियन्सविरुद्धच्या सामन्यापूर्वी त्याने हार्दिक, रोहित शर्मा आणि दिल्ली कॅपिटल्सशी संबंधित अनेक प्रश्नांची उत्तरे दिली.**






हंगाम सुरू होण्यापूर्वी मुंबई इंडियन्सने हार्दिक पंड्याला कर्णधार म्हणून नियुक्त केले आहे. तसेट संघ मालकांनी मुंबईला ५ वेळा चॅम्पियन बनवणाऱ्या रोहित शर्माला कर्णधारपदावरुन हटवण्याचा निर्णय घेतला. यानंतर हार्दिकला आपले भव्य स्वागत होईल, अशी अपेक्षा होती, पण तसे झाले नाही. मुंबई इंडियन्सच्या होम ग्राउंड वानखेडे स्टेडियमवर राजस्थान रॉयल्स विरुद्धच्या सामन्यात त्याला जोरदार धक्का बसला. याआधी अहमदाबादमध्ये गुजरात टायटन्सच्या माजी संघाविरुद्धच्या सामन्यादरम्यान प्रेक्षकांनी हार्दिकची हुर्यो उडवली होती.सौरव गांगुलीला हार्दिकबद्दल प्रश्न विचारण्यात आला, तेव्हा त्याने मनमोकळे उत्तर दिले. गांगुली म्हणाला की, “त्याला मुंबई इंडियन्सचे कर्णधारपद देण्यात आले यात हार्दिकची चूक नाही. संघमालकांनी हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे चाहत्यांनी हार्दिक पंड्याची हुर्यो उडवू नये. हे योग्य नाही. फ्रँचायझीने त्याची कर्णधारपदी नियुक्ती केली आहे. खेळात असेच घडते, मग तुम्ही भारतीय संघाचे कर्णधार असो किंवा कोणत्या फ्रेंचायझीचा कर्णधार असो. आता कर्णधारपदी नियुक्ती झाली आहे.”दरम्यान, सौरव गांगुलीने मुंबई इंडियन्सचा माजी कर्णधार रोहित शर्माचे कौतुक केले आहे. तो म्हणाला, “रोहित शर्माचा क्लास वेगळा आहे. या फ्रँचायझीसाठी त्याची कामगिरी, भारतासाठी कर्णधार आणि खेळाडू म्हणून त्याची कामगिरी एका वेगळ्या पातळीवर आहे. हार्दिकची कर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली ही त्याची चूक नाही.” रोहित शर्मा सध्या तिन्ही फॉरमॅटमध्ये भारतीय संघाचा कर्णधार आहे.भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार सौरव गांगुली आयपीएल सामन्यांदरम्यान मुंबई इंडियन्सचा नवा कर्णधार हार्दिक पंड्याची हुर्यो उडवल्याने संतापला आहे.

### हार्दिकची हुर्यो उडवू नये : गांगुली

हंगाम सुरू होण्यापूर्वी मुंबई इंडियन्सने हार्दिक पंड्याला कर्णधार म्हणून नियुक्त केले आहे. तसेट संघ मालकांनी मुंबईला ५ वेळा चॅम्पियन बनवणाऱ्या रोहित शर्माला कर्णधारपदावरुन हटवण्याचा निर्णय घेतला. यानंतर हार्दिकला आपले भव्य स्वागत होईल, अशी अपेक्षा होती, पण तसे झाले नाही. मुंबई इंडियन्सच्या होम ग्राउंड वानखेडे स्टेडियमवर राजस्थान रॉयल्स विरुद्धच्या सामन्यात त्याला जोरदार धक्का बसला.